निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१६ वा.
गुरूवार -०९ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## हवाई चप्पल घालणाऱ्याने हवाई सफर करावा हे माझं स्वप्न-पंतप्रधान नरेंद्र मोदी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित नवी मुंबई विमानतळाचे लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते करण्यात आले. त्यामुळे, आता लवकरच नवी मुंबईतून विमानाचे उड्डाण होणार असून डिसेंबर महिन्यात पहिले विमान आकाशी झेप घेणार आहे. सन १९९० च्या दशकातील ह्या विमानतळाची संकल्पना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले. तर, मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना, विजया दशमी, कोजागिरी आणि दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. मित्रो, आज मुंबईचा गेल्या अनेक वर्षांपासूनची प्रतिक्षा संपुष्टात आली.

आता मुंबईला दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळालं आहे. आशियातील सर्वात मोठे कनेक्टिव्हीटी हब म्हणून याची भविष्यात ओळख होईल, असेही मोदींनी म्हटले. तसेच, मुंबईत अंडरग्राऊंड मेट्रोचेही लोकार्पण झाले असून विकसित भारताचं हे प्रतिक असल्याचं मोदींनी म्हटलं. तसेच, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या तत्कालीन सरकारवरही टीका केली.

नरेंद्र मोदींनी पुढे बोलताना म्हटले की, मित्रांनो ही वेळ भारतीय युवकांसाठी असंख्या संधींचा क्षण आहे. मी महाराष्ट्रातील तरुणांना शुभेच्छा देतो, महाराष्ट्रातील लोकनेते दि.बा. पाटील यांचीही आठवण मी आज काढतो. त्यांचे सामाजिक जीवन, शेतकऱ्यांप्रती तळमळ आपल्यासाठी प्रेरणा आहे, असेही मोदींनी म्हटले. गेल्या ११ वर्षात भारतात वेगाने विकास होत आहे, वंदे भारत रुळावरुन धावते, हायवे आणि एक्सप्रेस नव्या शहरांना जोडत आहेत, बुलेट ट्रेनचं स्वप्न वेगाने साकार होत आहे, डोंगर-दऱ्यांमधून नवे बोगदे बनत आहेत. नवी मुंबई एअरपोर्ट हे विकसित भारताचे प्रतिक आहे, याचा आकार कमळाच्या



फुलासारखा असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीवर बनलेला आहे, असे मोदींनी म्हटले.

नवी मुंबई विमानतळामुळे येते गुंतवणूक वाढेल, नवे उद्योग निर्माण होतील, रोजगार निर्माण होतील. स्वप्नांना पूर्ण करण्याची इच्छाशक्ती असल्यास रिझल्टही दिसून येतात. २०१४ मध्ये मला देशवायीसांनी संधी दिली, तेव्हा माझं स्वप्न होतं, हवाई चप्पल घालणाऱ्यानेही हवाई सफर केला पाहिजे, आज ते प्रत्यक्षात होत आहे. आज भारतात विमानतळांची संख्या १६० च्या पुढे गेली आहे. जेव्हा लहान-सहान शहरात विमानतळ बनत आहेत, तेव्हा विकासाला गती मिळते. उडान योजनेंतर्गत लाखो लोकांनी हवाई प्रवास करत आपलं स्वप्न पूर्ण केलं. सध्या, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा डोमेस्टिक एविएशन मार्केट आहे. एकट्या भारतात १००० नवे विमान बनविण्याचं काम सुरू आहे. या दशकाच्या शेवटपर्यंत भारत एक नवा एमआरओ बनले. भारत आज जगातील सर्वात तरुण देश आहे, आमची ताकद आपली युवा पिढी आहे. त्यामुळेच तरुणाईला जास्तीत जास्त रोजगार देण्याचं काम आपण करत आहोत.

**काँग्रेससह उद्धव ठाकरेंनाही मोदींचा टोला**

राज्यात काहीजण सत्तेसाठी काम करतात, घोटाळे करुन विकासकामांना ब्रेक लावत आहेत. आज ज्या मेट्रो लाईनचे लोकार्पण झाले, ते याच लोकांच्या कामाची आठवण करुन देतो.

इथं काही काळासाठी एक सरकार आले, त्यांनी हे काम थांबवले, आता २ तासांचा प्रवास अवघ्या ३०-४० मिनिटांत होईल. पण, काहींना हे काम २-३ वर्षे थांबवलं हे कुठल्याही पापापेक्षा कमी नाही, असे म्हणत मोदींनी नाव न घेता उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला.

तसेच, मुंबईतील २६/११ च्या हल्ल्याचा उल्लेख करत मोदींनी काँग्रेसवर निशाणा साधला. या हल्ल्याबाबत नुकतेच तत्कालीन केंद्रीयमंत्र्यांनी काँग्रेस सरकारला उघडं पाडलं, असे म्हणत पी. चिदंबरम यांनी २६/११ च्या हल्ल्यानंतर सरकारने घेतलेल्या भूमिकेची आठवण करुन दिली. तसेच, पहलगाम हल्ल्यानंतर मोदी सरकारने पाकिस्तानमध्ये घुसून जशास तसे प्रत्युत्तर दिल्याचेही मोदींनी म्हटले.

## इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी जागा घ्या- मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यात इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली वसतिगृहे काही ठिकाणी भाडे तत्त्वावरील जागेत आहेत. वसतिगृहांसाठी आवश्यक शासकीय जागा उपलब्ध करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. तसेच पुढील पंधरा दिवसांच्या आत प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही त्यांनी

**वसतिगृह बांधकामासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासंबंधी बैठक**

उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, ज्या जिल्ह्यांमध्ये वसतिगृह उभारणीसाठी मालकीची जागा अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही, त्या जिल्ह्यांनी तातडीने योग्य जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत. जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन हस्तांतरण प्रक्रियेसाठी मोजणी शुल्क माफ करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे आणि विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश त्यांनी यावेळी दिले. मुंबई शहर व मुंबई उपनगर



यावेळी सांगितले.

मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारच्या 'बाबू जगजीवनराम छात्र आवास योजना' अंतर्गत वसतिगृह बांधकामासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासंबंधी मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी. धुळाज, दूरदृश्यप्रणालीद्वारे सर्व जिल्हाधिकारी, तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, असे असे निर्देशही दिले.बैठकीत वसतिगृहाच्या जागेबाबत सर्व जिल्ह्यांचा आढावा घेण्यात आला. दहा जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास विभागाच्या मालकीच्या जागा वसतिगृहासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्या जागा हस्तांतरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

## अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेले पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची जीवाची धावपळ



**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी /प्रतिनिधी /** तालुक्यातील अनेक गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक अक्षरशः जमिनीत कोसळले आहे. पिकाचे उत्पादन हातात आलेच होते, पण आकाशाने पुन्हा एकदा अवकाळी कोसळून शेतकऱ्यांचे सर्व स्वप्न पाण्यात गेले.

**सोयाबीन काढणीसाठी मजूर टंचाई.....**

हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला, असे वर्णन शेतकरी करत आहेत. पिक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची जीव तोडून धावपळ सुरू असून मजुरांची टंचाई त्यांच्या चिंतेत अधिक भर घालत आहे.गेल्या आठवड्याभरात पावसाने विश्रांती घेतली असली तरी ओलसर जमिनीत उभ्या असलेल्या सोयाबीन शेंगा कुजण्यास सुरुवात झाली आहे. हवामानातील अनिश्चिततेमुळे आणि सततच्या आर्द्रतेमुळे पिकावर बुरशीचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने काढणी करणे आवश्यक बनले आहे. पण गावोगावी मजूर मिळणे कठीण झाले आहे.

शेतकऱ्यांना मजुरीसाठी दिवसाला ५ ते ६ हजार रुपयांपर्यंत खर्च येत असून, एवढा खर्च परवडत नसल्याने अनेकांनी स्वतःच शेतात उतरून काढणी सुरू केली आहे.शेतकऱ्यांचे हात मात्र खचलेले नाहीत. घरातील महिला, तरुण मुले-मुली सुद्धा हातभार लावत आहेत. पण पिकाचे क्षेत्र मोठे असल्याने सर्व काम वेळेत पूर्ण होणे अवघड ठरत आहे. एका शेतकऱ्याने भावनिक स्वरात सांगितले, सोयाबीनचे सोन्यासारखे पिक उभे होते. पाऊस आला आणि सगळे स्वप्न चुरगळले. आता उरलेलं वाचवायचं म्हणून दिवस रात्र शेतात धावपळ चालू आहे.

या संकटातही शेतकऱ्यांना शासनाकडून काही मदत मिळेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मजुरीचा खर्च, बियाण्यांचा व खतांचा वाढलेला दर, आणि बाजारात दर घसरल्याने शेतकऱ्यांच्या माथी आर्थिक संकट कोसळले आहे.

अनेक ठिकाणी सोयाबीन शेंगा फुटल्याने आणि ओलसर झाल्याने बाजारपेठेत त्यांना योग्य भावही मिळत नाही. कृषी तज्ज्ञांच्या मते, या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे उत्पादनात ६० ते ७० टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी काढलेला घाम आणि मेहनत पाण्यात गेल्याने गावोगावी हतबलतेचे वातावरण आहे.

या वर्षी पाऊस चांगला झाला म्हणून आशेने सोयाबीन लावलं. पण काढणीच्या वेळीच पाऊस आला आणि सगळं पिक ओलसर झालं. आता शेंगा कुजायला लागल्या आहेत. मजूर मिळत नाहीत, स्वतःच शेतात उतरावं लागतं. एवढ्या मेहनतीचं चीज होईल की नाही याची भीती वाटते.

**-गोविंद तौर**
**शेतकरी**

घरातील सगळे शेतात उतरून काम करत आहोत. पिक वाचवायचं म्हणून दिवस रात्र शेतात आहोत. पण मजूर नाहीत, दर कमी आहेत, आणि बँकेचे कर्ज डोक्यावर आहे. सरकारने मदत केली नाही तर या वर्षी जगणं अवघड होईल.

**-ज्ञानेश्वर (माऊली) ढेरे**
**शेतकरी**

शेतकऱ्यांची मागणी:

मजूर टंचाई लक्षात घेऊन शासनाकडून विशेष अनुदान जाहीर करावे.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई मिळावी.पिक विमा योजनेत तातडीने सर्वेक्षण करून नुकसानाचा अहवाल सादर करावा.

बाजारात योग्य भाव मिळावा यासाठी सोयाबीन दराला हमीभाव दिला जावा.

## पैठण शहराचा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा - विभागीय आयुक्ताकडे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी/**नवीन जल कुंभ निर्माण पाठपुरावा कृती समितीच्या वतीने नगरपरिषद पैठण कार्यालयासमोरील टाकीचे बांधकाम पूर्ण होऊन एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटल्यानंतरही, पूर्णतः उभा राहिलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीतून शहरातील रहिवाशांना पिण्याचे पाणी पुरविण्यात येत नसल्यामुळे, कार्यकर्त्यांनी दिनांक २१ जुलै २०२५ रोजी तहसील कार्यालय पैठण समोर बेमुदत उपोषण सुरू केले होते.

याची नगर परिषदेने दखल घेऊन, ३० जुलै २०२५ पासून शहरातील नागरिकांना रंगार हट्टी परिसरातील नव्या टाकीमधून पाणीपुरवठा केला जाईल, असे लेखी पत्र कृती समितीस दिले होते.पत्र देऊन दोन महिने उलटल्यानंतरही, नगर परिषदेच्या गलथान कारभारामुळे नव्या टाकीतून नागरिकांना पाणीपुरवठा होत नसल्यामुळे, कृती समितीचे प्रसाद खिस्ती, मुरलीधर साबळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने विभागीय महसूल आयुक्त जितेंद्र पापळकर यांची दिनांक ७ ऑक्टोबर मंगळवारी संभाजीनगर येथे भेट घेऊन, नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या चीड आणणाऱ्या कारभाराचा पाडा वाचला. कामचुकार कर्मचाऱ्यावर



कारवाई करावी, दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीपुरवठा नियमित, सुरळीत करण्यात यावा, असे आशयाचे एक निवेदन त्यांना सादर करून त्वरित लक्ष घालण्याची विनंती केली आहे.नगरपरिषदेच्या निकामी झालेल्या पंपहाऊसची तसेच तहसील कार्यालयातील पडवयास झालेल्या पाण्याच्या टाकीचीही पाहणी करण्यासाठी एक पथक पाठवावे, असाही आग्रह शिष्टमंडळाने विभागीय आयुक्तांकडे धरला.

## सुप्रीम कोर्टातील शिवसेना पक्ष-चिन्ह सुनावणीत काय घडलं

### तारीख पे तारीख! ऐनवेळी सुनावणी लांबणीवर का पडली?

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** जवळपास गेल्या अडीच-तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाबाबतच्या प्रकरणाची सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. सर्वोच्च न्यायालय बुधवारी खंडपीठाने इतर प्रकरणांची सुनावणी आटोपती घेतली. त्यामुळे आजही सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाबाबत अंतिम युक्तिवाद होऊ शकला नाही. आता सर्वोच्च न्यायालयात १२ नोव्हेंबरला याप्रकरणाची पुढील सुनावणी आहे. त्यामुळे या खटल्याबाबत तारीख पे




शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत महत्त्वाचा निकाल देईल, अशी चर्चा कालपासून रंगली होती. मात्र, ऐनवेळी सशस्त्र सुरक्षा दलांसंदर्भात एक महत्त्वाचे प्रकरण सुनावणीला आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या तारीख, हा प्रकार पुन्हा एकदा पाहायला मिळाला.

आजच्या सुनावणीपूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे गट आणि शिंदे गटाला तुमच्या प्रकरणाची सुनावणी थोडक्यात होईल, असे स्पष्ट केले होते. यावर ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी आज सुनावणी शक्य नसेल तर पुढची तारीख द्या, अशी विनंती केली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने १२ नोव्हेंबरची तारीख दिली. त्यामुळे याप्रकरणाची पुढील सुनावणी १२ नोव्हेंबरला होईल. शिंदे गटाकडे सध्या शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह असल्याने त्यांना सुनावणीची फारशी घाई नाही. त्यामुळे शिंदे गटाने याप्रकरणाची सुनावणी डिसेंबर महिन्यात घेतली तरी चालेल, असे म्हटले.

यावर कपिल सिब्बल यांनी शक्य तितक्या तातडीच्या सुनावणीसाठी आग्रह धरला. तुम्हाला अंतिम युक्तिवादासाठी किती वेळ लागेल, असा प्रश्न न्यायालयाने सिब्बल यांना विचारला. त्यावर सिब्बल यांनी मी ४५ मिनिटांत युक्तिवाद पूर्ण करेन, असे सांगितले. येत्या जानेवारी महिन्यात महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यापूर्वी पक्ष आणि चिन्हाबाबतची सुनावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे लवकरची तारीख द्यावी, अशी विनंती कपिल सिब्बल यांनी केली. तेव्हा न्यायालयाने ही सुनावणी १२ नोव्हेंबरला होईल, असे सांगितले.

### आम्ही आमची बाजू भक्कमपणे मांडलेय, न्यायालयाचा निकाल मान्य: संजय शिरसाट

न्यायालयात आम्ही आमची बाजू भक्कमपणे मांडली आहे. कायद्यानुसार आमची बाजू भक्कम आहे. न्यायालय जो काही निकाल देईल तो आम्हाला मान्य असेल. प्रत्येकवेळी न्यायालयाला आरोपीच्या पिंजऱ्यात ठेवणं ही उबाठा गटाची मानसिकता झाली आहे. निकाल आमच्या विरोधात लागला तर संविधानानुसार, त्यांच्याविरोधात लागला तर संविधानाचा भंग, मग न्यायालयावरती ताशेरे ओढायला ते कमी करणार नाहीत. राज्यघटना मान्य आहे की नाही ते सांगा? जो निकाल लागेल तो मान्य करावा लागेल. निवडणूक आयोग, विधानसभा अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय सगळीकडे आम्ही आमची बाजू भक्कम मांडली आहे, अशी प्रतिक्रिया शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी दिली.

# महाराष्ट्रात वीज कर्मचारी ७२ तास संपावर; तुमच्यावर काय परिणाम?

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) मधील सात कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने ९ ते ११ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत तीनदिवसीय संप पुकारला आहे. खासगीकरण आणि पुनर्रचनेच्या मुद्द्यांवरील असंतोषामुळे हा निर्णय घेण्यात आला. या संपामुळे वीजपुरवठ्यात व्यत्यय येऊ नये यासाठी महावितरणने आपत्कालीन नियोजन पूर्ण केले असून, सर्व रजा रद्द करत कर्मचाऱ्यांना तातडीने कामावर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू करून हा संप बेकायदेशीर ठरवण्यात आला आहे.

सात कर्मचारी संघटनांनी खासगीकरण आणि पुनर्रचनेच्या विरोधात संपाची हाक दिली आहे. व्यवस्थापनाने ६ ऑक्टोबरला अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या उपस्थितीत चर्चा केली. खासगीकरण होणार नसल्याची ग्वाही देऊनही संयुक्त कृती समितीने संप कायम ठेवला. ३२९ उपकेंद्रांचे खासगीकरण झाल्याचा आरोप व्यवस्थापनाने फेटाळला, ही केंद्रे महावितरणच्या नियंत्रणाखाली असल्याचे स्पष्ट केले.

संपादरम्यान वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणने युद्धपातळीवर तयारी केली आहे. मुख्यालय आणि क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नियंत्रण कक्ष स्थापन झाले असून, दर तासाला वीजपुरवठ्याची माहिती घेतली जाईल. संपात सहभागी नसलेले कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि बाह्यस्त्रोत मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. वाहने, रोहीत्र, तारा आणि इतर साधनसामग्री उपलब्ध ठेवण्यात आली आहे.संपामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास घरगुती, शेती, उद्योग आणि रुग्णालयांना त्रास होऊ शकतो. पाणीपुरवठा पंप आणि आपत्कालीन सेवा प्रभावित होण्याची शक्यता आहे. यासाठी महावितरणने बॅकफिड व्यवस्था आणि प्राधान्याने अत्यावश्यक क्षेत्रांना वीजपुरवठा सुनिश्चित केला आहे.

मेस्मा कायद्यांतर्गत संप बेकायदेशीर आहे. नवीन कर्मचारी (एक वर्षापेक्षा कमी सेवा) आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा संपात सहभागी झाल्यास रद्द होऊ शकते. नियमित कर्मचाऱ्यांवर सेवेत खंड पाडण्याची कारवाई होऊ शकते. व्यवस्थापनाने दर चौथ्या सोमवारी नियमित संवादाचे आश्वासन दिले आहे.

महावितरणने नागरिकांना चुकीच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. २४ तास उपलब्ध टोल-फ्री क्रमांकांवर तक्रारी नोंदवता येतील. वीजपुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांसाठी मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ हे टोल फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहेत.

# आखाता'तील संघर्षाची दोन वर्ष

दोन वर्षापूर्वी म्हणजे ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्राईलवर हल्ला करून इस्त्राईलच्या १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्त्राईलने गाझा पट्टीवर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्त्राईल ने केलेल्या गाझापट्टीतील २३ लाख लोकसंख्येपैकी जवळपास सर्व लोक विस्थापित झाले आहेत. गाझात अन्न पाणी आणि सुविधांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. गाझा पट्टीत मदत साहित्य पोहचवण्यास ही इस्त्राईल बाधा आणत आहे. गाझापट्टीत प्रचंड उपासमार निर्माण झाली आहे. उपासमारीनेहजारो मुले कुपोषणग्रस्त झाली आहेत. गेल्या दोन वर्षात इस्त्राईलने केलेल्या हल्ल्यात पॅलेस्टाइनचे ६४ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यात १८ हजारांहून अधिक मुले आहे. या युद्धात इस्त्रायलने हमासचे २० हजारांहून अधिक दहशतवादी ठार केले आहेत. इस्त्राईलच्या हल्ल्यात गाझापट्टीत जखमी झालेल्या लोकांची संख्या दर महिन्याला सरासरी ६८०० इतकी वाढत आहे. या युद्धात इस्त्राईलचे हजारो नागरिक जखमी झाले आहेत. इस्त्राईलच्याही अनेक शहरांना हमासने टार्गेट केल्याने इस्त्राईलचीही दुरवस्था झाली आहे. इस्त्राईल - हमास युद्धाला आज दोन वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. मागील वर्षी ८ ऑक्टोबर रोजी म्हणजे इस्त्राईल - हमास युद्धाला १ वर्ष पूर्ण होत असतानाच इस्त्राईलने लेबनॉनवर हल्ला केला होता. इस्त्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसरुल्ला हा ठार झाला होता. त्या अगोदर इस्त्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्त्राईलने लेबनॉनवर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्त्राईल - हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्त्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले होते. इस्त्राईल - हमास नंतर इस्त्राईल - लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली. फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली होती कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्त्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्त्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली.

इराणने इस्त्राईल हमास युद्धात उडी घेतल्याने इस्त्राईल आणि इराण यांच्यात युद्धाचा भडका उडाला. या युद्धात ही दोन्ही बाजूंनी मोठी वित्त आणि मनुष्य हानी झाली. या दोन देशाला तर युद्धाचा मोठा इतिहास आहे. १९८० सालच्या दशकात तर या दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्त्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली होती. अर्थात इस्त्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्त्राईलची म्हणावी तशी हानी झाली नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्त्राईलने दिला आहे. हा इशारा खरा ठरवत इस्त्राईलने इराणवर क्षेपणास्त्रांचा मोठा हल्ला केला. हे युद्ध शिगेला पोहचले असताना अमेरिकेने मध्यस्ती केल्याने या युद्धाला काही काळ पूर्ण विराम मिळाला. या दोन्ही देशातील युद्ध काही काळ थांबले पण ते कायमस्वरूपी थांबले असे नाही. या दोन्ही देशात पुन्हा युद्धाला तोंड फुटू शकते. केवळ याच दोन देशातच नाही तर इस्त्राईल आणि त्यांच्या शेजारी असलेल्या अन्य मुस्लिम देशात युद्ध पेटू शकते. इस्त्राईल आणि अरब राष्ट्रातील या संघर्षाने जग दोन गटात विभागले गेले आहे. अमेरिका आणि युरोपातील काही देशांनी इस्त्राईलला पाठींबा दिला आहे तर जगातील मुस्लिम राष्ट्रे आणि युरोपातील काही राष्ट्रे अरब राष्ट्रांच्या पाठीशी उभी आहेत. अमेरिकेने इस्त्राईलला उघडपणे पाठिंबा दिल्याने इराणसह अन्य अरब राष्ट्रे इस्त्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानू लागली आहेत.

अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्त्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प हे विक्षिप्त आहेत. त्यांच्या मनात आले तर ते इस्त्राईलच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराणला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यायला हवी.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## बीड नगर परिषद अध्यक्षपद अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित
# मीनाताई वाघचौरे यांच्या उमेदवारीची जोरदार मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**बीड (विशेष प्रतिनिधी)** महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने बीड नगर पालिकेच्या अध्यक्षपदासाठीचे आरक्षण जाहीर केले असून, हे पद अनुसूचित जाती (SC) महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे.

या महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडीनंतर, बीड शहराच्या राजकारणात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असलेले माजी नगरसेवक आणि उपनगराध्यक्ष भीमराव वाघचौरे यांच्या पत्नी सौ. मीनाताई वाघचौरे यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी त्यांचे समर्थक आणि हितचिंतकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे केली आहे.

**आरक्षणामुळे वाघचौरे समर्थकांमध्ये रणनीती बदल**

बीड नगर पालिकेचे अध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गातून खुले असेल, अशी अपेक्षा भीमराव वाघचौरे यांच्या समर्थकांना होती, कारण त्यांचा अनुभव आणि समाजातील योगदान पाहता ते या पदासाठी प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र, नगर पालिकेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव झाल्याने, त्यांची थेट उमेदवारीची संधी हुकली. त्यामुळे समर्थकांनी तात्काळ रणनीती बदलून, वाघचौरे यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याची धुरा त्यांच्या पत्नी सौ. मीनाताई वाघचौरे यांच्याकडे सोपवावी, अशी एकमुखी मागणी लावून धरली आहे.

**भीमराव वाघचौरे यांचा राजकीय आणि सामाजिक वारसा**

भीमराव वाघचौरे हे हिंदू मांग (अनुसूचित जाती) प्रवर्गातून येतात. गेली सुमारे ३०-३५ वर्षे त्यांनी राजकारण आणि समाजकारण या दोन्ही पातळ्यांवर सक्रिय काम केले आहे. त्यांनी बी.ए. राज्यशास्त्र विषयात पदवी प्राप्त केली असून, ते उच्चशिक्षित आहेत. त्यांच्या यशस्वी राजकीय कारकिर्दीतील काही महत्त्वाचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत:

**सर्वप्रथम नगरसेवक:** १९९१ साली ते प्रथमच नगरसेवक म्हणून निवडून आले.

**अखंड कार्यकाळ:** त्यांना जनतेच्या आशीर्वादामुळे पाच वेळा नगरसेवक होण्याचा बहुमान मिळाला.

**उपनगराध्यक्ष:** १९९७ साली त्यांनी बीड नगर परिषदेचे उप-अध्यक्षपद भूषवले.महत्त्वाची भूमिका: नगरपालिका उपाध्यक्ष असताना त्यांनी आरोग्य, अर्थ आणि नियोजन यांसारख्या महत्त्वाच्या समित्यांमध्ये सक्रिय काम केले.

**शहर विकास:** बीड शहराचा




डेव्हलपमेंट प्लॅन (DP Plan) तयार करण्यामध्ये आणि जिल्हा नियोजन समितीत (डीपीडीसी) सदस्य म्हणून त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली होती.भीमराव वाघचौरे यांनी लोकहिताला प्राधान्य देत केलेले काम आणि त्यांची अखंड लोकसेवा यामुळे बीड शहराला त्यांचा अनुभव अध्यक्षपदासाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा समर्थकांना आहे. त्यांच्या पत्नी सौ. मीनाताई वाघचौरे यादेखील पदवीधर आहेत.

**पक्षश्रेष्ठींकडे अधिकृत मागणी**

सौ. मीनाताई वाघचौरे यांच्या उमेदवारीसाठी भीमराव वाघचौरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांकडे अधिकृत मागणी करण्याचे निश्चित केले आहे.या मागणीत पुढील प्रमुख नेत्यांचा समावेश आहे:

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वसर्वा, माननीय अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष माननीय सुनील तटकरे साहेब, आमदार धनंजय मुंडे, आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष चव्हाण साहेब, जेष्ठ नेते अजितसिंह साहेब, डॉ. योगेश क्षीरसागर पत्रकारांशी बोलताना भीमराव वाघचौरे यांनी सांगितले की, आरक्षणामुळे थोडी निराशा झाली असली तरी, सर्व कार्यकर्ते आणि हितचिंतकांची इच्छा आहे की मीनाताई वाघचौरे यांना उमेदवारी मिळावी. जनतेची ही मागणी पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलतांना मा. कुलगुरू प्रा. सोनवणे म्हणाले की महर्षी वाल्मिकी यांनी 'रामायण' च्या लेखनातून आदर्शवादावर आधारित जीवनपद्धतीचा परिचय करून दिला. जे आजही आम्हा सर्वांना मार्गदर्शक आहे. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी रामायण सारख्या महाकाव्याची निर्मिती करणाऱ्या महर्षी वाल्मिकी यांचे स्मरण प्रेरणादायी असल्याचे सांगितले. जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, अमरावती विभागीय केंद्र संचालक डॉ. जयवंत वर्ते, कृषी विज्ञान केंद्र संचालक डॉ. नितीन ठोके, विद्यार्थी बहि:शाल केंद्राचे संचालक डॉ. दयाराम पवार, महाज्ञानदीप प्रकल्प संचालक गणेश लोखंडे यांचायासह विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी - कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बजरंग सोनवणे मुंबईवरून आले असे कपिलधारवाडीत गेले; जमिनीला पडलेल्या भेगांची केली पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**बीड/ प्रतिनिधी/** बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात जमिनीतील भेगा व जमीन खचणे असे प्रकार घडल्याने नागरिक भयभीत आहेत. या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (GSI), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिलेले आहे. दरम्यान, दि.७ रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईवरून बीड जिल्ह्यात दाखल झाले. आल्या आल्या त्यांनी केजला न जाता कपिलधारवाडीत जात भेगांची पाहणी केली.

कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या



स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (त्रह्ड्ख) केंद्रातील तज्ज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी संबंधित विभागाला दिले आहे. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे विकास कामाच्या निमित्ताने दोन दिवस मुंबईत होते. ते मंगळवारी सायंकाळी बीड जिल्ह्यात दाखल झाले. जिल्ह्यात आल्यानंतर ते थेट कपिलधारवाडीत गेले. गावात पडलेल्या भेगा आणि पडझडीची पाहणी केली. त्याठिकाणी गावातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केलेले असून त्याठिकाणी महिला भगिनीची भेट घेतली. ग्रामस्थांशी संवाद साधत त्याना धीर दिला. आपण उपाय योजनासाठी पत्रव्यवहार करत आहोत. तुम्ही काळजी करू नका, मी तुमच्यासोबत आहे, असा विश्वासही दिला. यावेळी बीडचे तहसीलदार सोबत होते.

**भूगर्भ सर्वेक्षण विभागाकडे अशी मागणी**

सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (छउ्न्व-) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी. या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेला वाढती पसंती

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**
वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या 'गो-ग्रीन' योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये तब्बल २ लाख ३ हजार ३४० वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे.वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडून सोमवार (दि. ६) पर्यंत लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही ७ लाख ६ हजार ९२४ ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहे व त्यांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

'गो-ग्रीन योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे', असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

गेल्या तीन महिन्यांत २ लाखांवर ग्राहकांचा सहभाग - वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये २ लाख ३ हजार ३४० ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात सर्वाधिक पुणे प्रादेशिक विभागातील ८७ हजार ४० ग्राहकांचा तर कोकण प्रादेशिक विभागातील ७८ हजार




८२९ ग्राहकांचा समावेश आहे.

या योजनेत आतापर्यंत ७ लाख ६ हजार ९२४ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पुणे प्रादेशिक विभागात सर्वाधिक २ लाख ८८ हजार २३८ (३.४६ कोटी), कोकण- २ लाख ६२ हजार २३७ (३.१५ कोटी), नागपूर प्रादेशिक विभाग- ८४ हजार ५३१ (१.०१ कोटी) आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागामध्ये योजनेत सहभागी ७१ हजार ९१८ वीजग्राहकांना ८६ लाख ३० हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.असे व्हा योजनेत सहभागी - गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या ु.ारहरवळीलो.ळप या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोय देखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून गो-ग्रीनचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. यात ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा फायदा होत आहे.

विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदे - गो-ग्रीन सहभागी झालेल्या ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईल 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही ऑनलाईन बिल भरणे सोयीचे झाले आहे. इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणक किंवा मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# संक्षिप्त

## ओबीसी आरक्षण आंदोलन आणि पत्रकारिता-राजाराम पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** विद्येविना मती गेली.ओबीसींच्या गुलामगिरी मागचे सत्य महात्मा जोतिबा फुले यांनी सागितले. त्याचबरोबर त्या गुलामगिरीवरचा उपाय हा स्त्री शिक्षण आहे हे सांगून ते थांबले नाहीत.त्याची सुरुवात आपल्या घरातून केली.आमचे गुरू म्हणून किती ओबीसी जातींनी हा सावित्री जोतिबाचा शिक्षणाचा मार्ग स्वीकारला आहे?.ओबिसिनी आपल्याकडील सारा पैसा कधी मुलींच्या शिक्षणास लावला आहे का?.उत्तर नाही.असेच आहे.

ओबीसींच्या आठशेहून अधिक जाती आहेत.म्हणजेच ८६१ जाती आहेत.असे आमचे बंधू प्रा.मनोहर धोंडे सांगतात.यातील मी आगरी कोळी, कराडी,भंडारी, कुणबी, माळी या कोकणातल्या ओबीसी जातीना हा प्रश्न विचारतो.किती घरात आज पदवीधर मुली,बहीण,पत्नी,आई,मावशी,आजी,काकी आहेत?.स्त्री शूद्र अतिशूद्र यांच्यावर मनुस्मृतीच्या हिंदू उच्चवर्णीयांनी लादलेल्या गुलामी वर स्त्री शिक्षण हाच उपाय आहे.आज ओबीसी आरक्षणाची लढाई लढताना,आम्ही किती स्त्रियांचे नेतृत्व उभे करू शकलो?.जोपर्यंत भारतीय स्त्री या शूद्र ओबीसींच्या गुलामगिरी विरुद्ध उभी राहत नाही.तोपर्यंत आम्ही स्वातंत्र्याचा अनुभव घेत नाही.आजही समस्त ओबीसी संघटना,राजकीय पक्ष,विचारमंच हे स्त्री विरोधी म्हणजेच पुरुषसत्ताक म्हणजेच मनुवादी असतील ?.तर समता,आरक्षण,शिक्षण प्रबोधन हे खूप दूर आहे.

हिंदू वैदिक ब्राह्मणी धर्माची गुलामगिरी आमच्या ओबीसी जातींमध्ये कशी घट्ट रुजली आहे.हे आपल्या लक्षात येते.ती दूर करण्याचे आंदोलन आपल्या घरातूनच सुरू होते. हे महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीमाई फुले यांनी आम्हास दिलेला आदर्श आहे.महात्मा जोतिबा फुले यांना महात्मा ही उपाधी मुंबईतल्या आगरी कोळी भंडारी यांनी दिली.त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर नारायण नागू पाटील,ओबीसी नेते दि बा पाटील,ड दत्ता पाटील यांनी गुरु मानले.या सर्वांनी आपापल्या काळात शिक्षण चळवळीचा,वृत्तपत्रे काढून रोज आपल्या लोकांसाठी प्रबोधन पर लिहिण्याच्या महात्मा फुले सावित्री माईंचा विचार पुढे आणला. शिक्षण वाचन लेखन वक्तृत्व पत्रकारिता हे माणूस घडविण्याचे आधुनिक साधन आहे. ही गोष्ट आमच्या नेतृत्वाने सांगितली.आम्ही आत्मसात केली नाही. आमचे पारंपरिक शत्रु ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांनी त्या लोकशाहीच्या बलस्थानावर आज कब्जा केला आहे.शिक्षण वाचन लेखन प्रसार माध्यमांचे आधुनिक स्वरूप म्हणजे आमच्या हातातील आमच्या मालकीचे मोबाईल आहेत.ते आमच्या हितासाठी कसे वापरायचे? हे ही आम्हास कळत नसेल? तर आम्हीच आमचे शत्रू आहोत.हे सिद्ध होत आहे.

ओबीसी जातीना आपले मनुवादी शत्रू समजून येऊ नये.यासाठी सोशल मिडिया, शालेय शिक्षण,पत्रकारिता यात इतिहास बदलण्याचा कार्यक्रम उच्च जातीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांनी सुरू केला आहे.ज्यांनी ओबीसींचे शोषण केले ते ब्राह्मण सांगत आहेत .आम्ही गरीब झालो.वस्तुस्थिती अशी आहे.देशाच्या सर्व मंदिर,जमिनी धर्म सत्ता,राजकीय सत्ता यावर एकत्रितपणे सत्ता ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांची आहे.आज या उच्चजातीय लोकांसाठी घटनाबाह्य एथड हे आर्थिक दुर्बलांसाठी आरक्षण दिले गेले.याच प्रमाणे जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनास अनुकूल निर्णय घेऊन कुणबी दाखले देण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय हा ओबीसी आरक्षण संपविण्याचा निर्णय आहे.हे आम्ही ओबीसींना समजवण्यात कमी पडत आहोत.जे या देशातील शोषक आहेत. ते आज आरक्षण मागत आहेतं.म्हणजेच चोरांच्या उलट्या बोंबा आहेत.हे बोलणारा प्रबोधनकार नसल्यामुळे सर्वत्र उच्चवर्णीय ब्राह्मण मराठा आरक्षणाच्या मुक्त चर्चा चक्क मा उच्च न्यायालयात सुरू आहेत.जुलमी सनातनी मागास वर्गीय लोकांतून सरौच्च ठिकाणी म्हणजे सुप्रीम कोर्टात सर न्यायाधीश पदी बसूनही सन्माननीय न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर,चप्पल फेकणारे ही उच्चजातीय सनातनी मंडळी उघडी करणारी लेखणी आमच्या कडे नाही.

देशाचे पंतप्रधान मी ओबीसी आहे.असे सागून,ओबीसी विरोधी निर्णय घेतात.आज नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन ते करीत आहेत.परंतु एका शूद्र ओबीसी नेत्याचे नाव म्हणजेच दि बा पाटील यांचे नाव ते देत नाहीत.ज्या ओबीसी आगरी कोळी कराडी या शेतकरी मच्छीमार प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी,नवा भूसंपादन कायदा नाकारून घेतल्या.तो विमानतळ उच्चवर्णीय अदानी ला दिला.ही फसवणूक आम्ही आमच्याच लोकांना सांगू शकत नाही.येथे आलेला मोदींच्या वैश्य जातींचा व्यापारी आमदार महेश बालदि पुनर्वसन झाले.असे चक्क खोटे बोलतो.मा उच्च न्यायालय सांगते अडाणी अशिक्षित शेतकरी यांच्याकडून संमती पत्रे लिहून घेऊन ऋ्ठ द्वारे घेतल्या गेलेल्या जमिनी ही आमची फसवणूक आहे.जमिनी भूसंपादन कायदा २०१३ नुसारच घ्याव्यात हे कायदा सांगतो.त्याविरोधात आमदार कसे बोलू शकतात?

देवेंद्र फडणवीस सांगतात.त्यांचा ब्राह्मण ऊछ- हा ओबीसी शूद्र आहे.मग तुम्ही ओबीसींना ब्राह्मण जातींचे दाखले देऊन शंकराचार्य कराल का? तिकडे जरांगे सांगतात.आम्ही शूद्र शोषित कुणबी झालो.आम्हाला ओबीसी आरक्षण द्या.या निर्लज्ज,अस्तित्वहीन चर्चा समजून घेण्यासाठी विषमते विरुद्ध लिहिलेले साहित्य वाचायला हवे.जे फुले शाहू आंबेडकर यांनी लिहिले आहे.ते ओबीसी सभा संमेलने यात विक्रीस असते काय?. मुळात ओबीसी नेते कार्यकर्ते आरक्षणास कारण असलेली, ब्राह्मण मराठा वैश्य यांची काळीकुट्ट शोषक माहिती कधी लोकांसमोर आणतात का?

ओबीसी बांधवांनी किमान आपले मोबाईल नव्या समतेच्या साविधानिक समतेच्या अभ्यासासाठी वापरले पाहिजेत.आपल्या नेतृत्वाची भाषणे सभांमध्ये रेकॉर्ड केली पाहिजेत.ओबीसी ना स्वतः चा मिडिया नाही.खिशात असलेला मोबाईल जे प्रबोधनासाठी वापरत नाहीत.हा माझा अनुभव आहे.अर्थात जेव्हा आमच्या आजी आजोबांना पाटी खडू नाकारणारी सरस्वती होती.तेव्हा शेणाचे गोळे अंगावर घेत धाऊन आलेली सावित्री आठवा.आज हातात चित्रीकरण करू शकणारा,लेख बातम्या टाइप करू शकणारा,बोलणारा चर्चा करणारा मोबाईल हाती असतानाही आम्ही गुलाम असू तर दोष कुणाचा?.आमचाच ना?

जय ओबीसी.

**-राजाराम पाटील**
**उरण,जिल्हा रायगड.**

# रहीमपूर जिल्हा परिषद शाळेची दुरवस्था: १४४ विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील रहीमपूर येथील जिल्हा परिषद शाळेची भीषण दुरवस्था समोर आली आहे. १४४ विद्यार्थ्यांच्या या शाळेत गळणारे छत, शौचालयांचा अभाव, पिण्याच्या पाण्याचा साठा नसणे, कोसळलेली संरक्षण भिंत,तुटलेले स्वयंपाक घर आणि रंगरंगोटीचा अभाव यामुळे शाळेची अवस्था अक्षरशः जीर्ण झाली आहे. केवळ ३ शिक्षक असल्याने शिक्षणाचा दर्जा पूर्णपणे कोलमडला आहे. या सर्व गंभीर समस्यांमुळे स्थानिक पालक, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते संतप्त झाले असून, लवकरच उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून तात्काळ दुरुस्ती आणि सुधारणांची मागणी करण्याची तयारी करत आहेत.शाळेची विदारक स्थिती गंगापूर तालुक्यातील रहीमपूर येथील जिल्हा परिषद शाळेची अवस्था इतकी दयनीय आहे की,येथील विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता गंभीर धोक्यात आहे. खालील समस्यांनी शाळा पूर्णपणे खिळखिळी झाली आहे:गळणारे छत: पावसाळ्यात वर्गखोल्या पाण्याखाली बुडतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागाच राहत नाही. गळणाऱ्या छताखाली अभ्यास करणे धोकादायक बनले आहे.

**उच्च न्यायालयात याचिका दाखल होणार**

शौचालयांचा अभाव: शाळेत पुरेशी आणि स्वच्छ शौचालये नाहीत. यामुळे विशेषतः मुलींना असुरक्षित आणि अस्वच्छ परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागते, ज्याचा त्यांच्या आरोग्यावर आणि उपस्थितीवर परिणाम होत आहे.पाण्याचा साठा नाही: शाळेत पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. विद्यार्थ्यांना तहानलेलेच तासंतास अभ्यास करावा लागतो,ज्यामुळे त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात आहे.कोसळलेली संरक्षण भिंत: शाळेची संरक्षण भिंत पूर्णपणे पडलेली आहे, ज्यामुळे शाळेचा परिसर असुरक्षित झाला आहे. बाहेरील व्यक्ती किंवा प्राण्यांचा सहज प्रवेश होऊ शकतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.तुटलेले स्वयंपाकघर: मध्यान्ह भोजन योजनेच्या स्वयंपाकघरातील टिन पत्रे तुटलेली असल्याने स्वयंपाक करणे कठीण झाले आहे. यामुळे मुलांना अनेकदा अन्नाशिवाय राहावे लागते.केवळ ३ शिक्षक: १४४ विद्यार्थ्यांसाठी फक्त ३ शिक्षक उपलब्ध आहेत, ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेसे लक्ष मिळत नाही आणि शिक्षणाचा दर्जा अत्यंत खालावला आहे.रंगरंगोटीचा अभाव: शाळेची इमारत रंगविलेली नसल्याने ती विद्रूप दिसते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल आणि शाळेचे वातावरण उदासीन झाले आहे.

**कायदेशीर लढ्याची तयारी**

स्थानिक पालक संघटनेचे नेते जुबेर शेख यांनी संताप व्यक्त करत सांगितले, आमच्या मुलांचे भविष्य अंधारात आहे. शिक्षणाचा मूलभूत अधिकार (ठढए) कायद्यांतर्गत प्रत्येक शाळेत सुरक्षित छत, स्वच्छ शौचालये, पिण्याचे पाणी, पुरेसे शिक्षक आणि मूलभूत सुविधा असणे बंधनकारक आहे. पण जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाने वर्षानुवर्षे आमच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले आहे. आता आम्ही उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार आहोत. याचिकेत प्रशासनाला पक्षकार करण्याची योजना आहे, ज्यामुळे शाळेच्या तात्काळ दुरुस्ती आणि सुधारणांसाठी कायदेशीर मार्ग मोकळा होईल.





**प्रशासनाची उदासीनता**

जिल्हा परिषद अधिकाऱ्यांनी निधीच्या कमतरतेचे कारण पुढे केले आहे, परंतु स्थानिक ग्रामस्थांनी याला प्रशासनाची उदासीनता आणि निष्क्रियता ठरवली आहे. आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून तक्रारी करत आहोत, पण कोणतीही कारवाई झालेली नाही. आमच्या मुलांचे शिक्षण आणि सुरक्षितता यांच्याशी खेळ खेळला जात आहे, असे ग्रामस्थ सादीक शेख यांनी सांगितले. ठढए कायद्याचे स्पष्ट उल्लंघन करणारी ही परिस्थिती केवळ रहीमपूर शाळेपुरती मर्यादित नसून, महाराष्ट्रातील शेकडो जिल्हा परिषद शाळांची हीच अवस्था आहे.

**सामाजिक आणि शैक्षणिक परिणाम**

या समस्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होत आहेच, शिवाय त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यही धोक्यात आहे. विशेषतः मुलींना शौचालयांच्या अभावामुळे शाळेत येण्यास अडचणी येत आहेत, ज्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडत आहे. सामाजिक कार्यकर्त्या गंडे म्हणाले, ही केवळ एका शाळेची कहाणी नाही, तर ग्रामीण महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेची दुरवस्था दर्शवणारी ही परिस्थिती आहे. सरकारने तात्काळ लक्ष देऊन या समस्यांचे निराकरण करावे.

**भविष्यातील दिशा**

प्रस्तावित जनहित याचिकेमुळे रहीमपूर शाळेच्या दुरुस्तीला गती मिळण्याची आशा आहे. स्थानिकांनी मागणी केली आहे की, शाळेच्या पुनर्बांधणीसाठी तात्काळ निधी मंजूर करून मूलभूत सुविधा पुरवल्या जाव्यात. जर उच्च न्यायालयाने यात हस्तक्षेप केला, तर केवळ रहीमपूरच नाही, तर इतर अशा शाळांनाही न्याय मिळेल, असे सामाजिक कार्यकर्ते जमीर शेख यांनी सांगितले. येत्या काही आठवड्यांत याचिका दाखल होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे शाळेच्या पुनर्बांधणीसाठी आणि शिक्षकांच्या नियुक्तीसाठी मार्ग मोकळा होईल.

**समाजाचा आवाज**

रहीमपूरच्या शाळेच्या या दुरवस्थेने संपूर्ण गंगापूर तालुक्यात खळबळ उडवली आहे. स्थानिकांनी सोशल मीडियावर SaveRahim-purSchool मोहीम सुरू केली असून, शिक्षण हक्कासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आमच्या मुलांना दर्जेदार शिक्षण आणि सुरक्षित वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे. आम्ही यासाठी लढत राहू, असे पालक सुनिता पाटील यांनी ठणकावले.

# गंगापूर नगरपरिषदेची निवडणुकीसाठी प्रभाग निहाय आरक्षण सोडत जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/** गंगापूर नगरपरिषदेची निवडणुकीसाठी प्रभाग निहाय आरक्षण सोडत मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी तहसिल कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. या सोडतीची प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक आणि शासकीय नियमांनुसार करण्यात आली. विशेष म्हणजे, आरक्षण साठी लॉटरीच्या चिठ्ठ्या दोन लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आल्या. आरक्षण सोडती साठी आयुष कुमावत व शिवन्या बाराहाते या लहान मुलांनी चिठ्ठ्या काढून प्रभागनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. नगरपरिषदेच्या नव्या आरक्षणानुसार, गंगापूर नगरपरिषदेत १ नगराध्यक्ष, १० महिला नगरसेविका आणि १० पुरुष नगरसेवक असा एकूण २१ सदस्यांचा समावेश राहणार आहे. प्रभाग निहाय आरक्षण



पुढीलप्रमाणेः प्रभाग क्र. आरक्षण प्रकार १) ओबीसी महिला, ओपन २) ओपन महिला, ओपन पुरुष ३) ओबीसी महिला, ओपन पुरुष ४) एस.सी. पुरुष, ओपन महिला ५) एस.सी. महिला, ओपन पुरुष ६) ओपन महिला, ओपन पुरुष ७) ओबीसी पुरुष, ओपन महिला ८) ओबीसीमहिला, ओपन पुरुष ९) ओपन पुरुष, ओपन महिला १०) ओबीसी पुरुष, ओपन महिला सोडत प्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष आगळे, निवडणूक अधिकारी सुचिता शिंदे, तसेच अनेक नागरिक, राजकीय कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या आरक्षणानुसार गंगापूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीत सर्व घटकांना प्रतिनिधित्व मिळणार असून महिलांसाठी राखीव प्रभागांची संख्या लक्षणीय आहे. या सोडत वेळी सुरेश नेमाडे, फैसल चाऊस, भाग्येश गंगवाल, विजय पानकडे, दिनेश गायकवाड, सूर्यकांत गरड, तुकाराम सटाले, योगेश पाटील, मुकुंद जोशी, राहुल वानखेडे, अख्तर सय्यद, फैसल बासोलान, हनीफ बागवान, गुलाब शहा, मुसा खान, महेंद्र राऊत, संदीप बोजवारे, कैलास साबणे, आनंद पाटील, सतीश शेळके, सुनील खाजेकर, अमोल बोरकुल, शरद दारुंटे, इरफान शेख, अश्फाक सय्यद यांसह अनेक नागरिक उपस्थित होते. तर या गंगापूर नगरपरिषदेची निवडणुकीसाठी प्रभाग निहाय आरक्षण सोडत आयोजित कार्यक्रमासाठी नगरपरिषद कर्मचारी सचिन खाजेकर, सुधीर खाजेकर, संजय नारले, युनुस शेख, इजहार शेख, कल्याण खाजेकर, संतोष होरो, सागर गलांडे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हाप्रशासन देणार शेतकऱ्यांना 'हात मदतीचा'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्ह्यात शेतकरी आत्महत्याग्रस्त व अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी 'हात मदतीचा' हा उपक्रम दि.११ ते १५ ऑक्टोंबर दरम्यान राबविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्देश दिले आहेत.यासंदर्भात आदेशही निर्गमित केले आहेत.आत्महत्याग्रस्त शेतकरी तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकरी यांना मदत व्हावी यासाठी हे अभियान दि.१० ते १५ ऑक्टोंबर या कालावधीत राबविण्यात येईल. बाधीत कुटुंब ज्या योजनेंतर्गत मदतीसाठी पात्र ठरतील त्यांतर्गत मदत देण्यात येईल. तसेच जे पात्र ठरत नाहीत अशा कुटुंबांना स्वयंसेवी संस्था, संघटना यांच्या माध्यमातून मदत देण्यात येईल.त्यासाठी दि.११ रोजी स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था, संघटना यांच्यासमवेत बैठक घेऊन मदतीचे नियोजन करण्यात येईल. दि.१४ व १५ ऑक्टोंबर रोजी तालुकास्तरावर कार्यक्रम घेऊन मदत धनादेश, मंजूरी आदेश इ.चे वाटप करण्यात येईल. दि.११ रोजी पात्र कुटुंबाकडुन अर्ज भरुन घेणे, कागद पत्रे भरुन घेतील. ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहाय्यक यांनी ही पूर्तता करतील. दि.१३ ऑक्टोंबर रोजी अपूर्ण कामे पूर्ण करणे व मंजूरी देणे, धनादेश, मंजूरी आदेश तयार करणे, दि.१४ व १५ ऑक्टोंबर रोजी तहसिल कार्यालयात मदत वाटप कार्यक्रम आयोजीत करुन मदत वाटप करण्यात येईल. मदत वाटपाचे कार्यक्रम साध्या स्वरुपात असावे,अशी सुचनाही देण्यात आली आहे.याप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम देण्यात आला असून शेतकरी आत्महत्याग्रस्त व अतिवृष्टीग्रस्त शेतकरी कुटुंबांना ऐन सणाच्या आधी हा मदतीचा हात दिला जाणार आहे.

# शून्य अपघाती मृत्यूचे लक्ष्य गाठण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारत सरकारच्या रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाने 'शून्य अपघाती मृत्यू जिल्हा' या उपक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची निवड केली आहे. जिल्ह्यात रस्त्यावर होणाऱ्या अपघातांमध्ये मृत्यूदर शून्यावर आणण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी प्रभावी उपाययोजना राबवाव्या, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू होत असलेल्या देशातील १०० जिल्ह्यांची निवड भारत सरकारच्या रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयामार्फत एका सर्व्हेक्षणाद्वारे करण्यात आली आहे. या जिल्ह्यात रस्ते अपघातातील मृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश आहे. त्याअनुषंगाने आज जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, पोलीस उपायुक्त वाहतुक शर्मिष्ठा वालावलकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश लढ्ढा, अधीक्षक अभियंता एस.एस. भगत, कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण तसेच अन्य अधिकारी




उपस्थित होते.बैठकीत माहिती देण्यात आली की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २०२४ मध्ये ३७३ अपघात झाले त्यात ४६८ मृत्यू झाले. तसेच सन २०२५ मध्ये ४०३ अपघातात ५०८ जणांचे मृत्यू झाले, अशी आकडेवारी सेव्ह लाईफ फाऊंडेशन या संस्थेने सर्व्हेक्षण करुन दिली आहे. अपघात टाळता यावे यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व अपघातानंतर जखमींना तात्काळ उपचार सुविधा उपलब्ध करण्यासाठी उपाययोजना राबविण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले. त्यात अपघात प्रवण स्थळे निश्चित करुन तेथे रस्ते सुरक्षा उपाययोजना राबविणे, आपत्कालिन परिस्थितीत जखमींना उपचार सुविधा देण्यासाठी लागणारा कालावधी कमी करणे, वाहन चालवितांना वाहन चालकांकडून होणाऱ्या नियमभंगांविरुद्ध कारवाई करणे याबाबत चर्चा करण्यात आली.

रस्ते अपघातात मृत्यू होण्याची प्रमुख कारणे- हेल्मेट, सीट बेल्ट न वापरणे, अति वेगात वाहन चालविणे, मद्यपान/ नशापान करुन वाहन चालविणे, वाहन चालकांचे आरोग्य नीट नसणे (दृष्टीदोष वगैरे), वाहन सदोष/ नादुरुस्त असणे, वाहन चालवितांना मोबाईल वापरणे, जादा भार असणे, वाहनांना दिवे प्रखर असणे, रिफ्लेक्टर्स नसणे वा सदोस असणे, इ. प्रमुख कारणे देण्यात आली आहेत.जिल्ह्यात एकूण ६६ अपघातप्रवण स्थळे आहेत. या स्थळांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना जसे आवश्यक अभियांत्रिकी बदल, सुचना, दिशा फलक लावणे, नजिकच्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणे इ. उपाययोजना राबविण्यासाठी ९ कोटी रुपयांचा आराखडाही परिवहन विभागाने आज सादर केला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, रस्ते अपघातात होणारे मृत्यूचे प्रमाण अधिक असणे ही बाब जिल्ह्यासाठी भूषणावह नाही. रस्ते अपघातात होणाऱ्या मृत्यूंचे दर कमी करुन ते प्रमाण शून्यावर आणण्यासाठी संबंधित प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी चोख पार पाडावी. त्यानुसार उपाययोजना राबवाव्या. वाहन चालक हा यातील सर्वात महत्त्वाचा घटक असून त्यांच्या आरोग्य तपासणीपासून, समुपदेशनापर्यंत उपाययोजना राबवाव्या. दिवाळीच्या सुटीत स्कुल बसच्या वाहन चालकांची आरोग्य तपासणी करुन घ्यावी. अन्य ट्रक व बसेस चालकांचीही आरोग्य तपासणी व समुपदेशन गटागटाने करण्यात यावे. अपघातप्रवण क्षेत्राच्या दोन्ही बाजूला ठराविक अंतराने सुचना फलक लावावे. अपघातप्रवण स्थळांच्या जवळ रुग्णवाहिका व वैद्यकीय सुविधांची उपलब्धता ठेवणे, जनजागृती करणे अशा उपाययोजना राबवाव्या,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# स्मार्ट टीओडी मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या जालन्यातील आणखी ६६ जणांवर कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** महावितरणतर्फे बसवण्यात आलेल्या अत्याधुनिक स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी होत असल्याचे प्रकार नियमितरीत्या उघडकीस येत आहेत. नुकतेच जालन्यातील आणखी ६६ ग्राहक स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करताना आढळले. महावितरणची स्थानिक कार्यालये व भरारी पथकांच्या संयुक्त कारवाईत जवळपास ९ लाख रुपयांची वीजचोरी उघड झाली आहे. या वीजचोरांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणार आहेत. दरम्यान, मागील तीन महिन्यांत टीओडी मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या ६५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. महावितरणच्या या धडक कारवाईमुळे वीजचोरांत एकच खळबळ उडाली आहे. दररोज नवनवीन प्रकरणे बघता अत्याधुनिक मीटरमध्येही ग्राहकांना वीजचोरीस मदत करणारे मोठे रॅकेट जालना जिल्ह्यात सक्रिय असण्याची शक्यता आहे. या रॅकेटचा छडा लावून आरोपींना गजाआड करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

टीओडी मीटरमध्ये ग्राहकाने फेरफार केल्यास त्याची माहिती थेट महावितरणला ऑनलाइन कळत आहे. अशा ग्राहकांची प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतर वीजचोरी पकडली जात आहे. जालना शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात महावितरणने गेल्या काही महिन्यांत केलेल्या तपासणीत टीओडी मीटरमध्ये वीजचोरी केल्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत. या ग्राहकांना काही महिन्यांपूर्वी टीओडी मीटर बसवण्यात आले होते. पण त्यांनी मीटरमध्ये फेरफार केल्याची माहिती महावितरणला लगेच ऑनलाइन उपलब्ध झाली. या ग्राहकांनी वीजचोरी केल्याचे प्रत्यक्ष तपासणीत आढळून आले.

जालना जिल्ह्यात स्मार्ट मीटरमध्ये मोठ्या संख्येने वीजचोरीची प्रकरणे पाहता सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या नेतृत्वाखाली, अधीक्षक अभियंता संजय सरग व उपसंचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) सतीश कापडणी यांच्या समन्वयातून स्थानिक कार्यालये तसेच छत्रपती संभाजीनगर शहर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, जालना, बीड व नांदेड येथील भरारी पथकांनी धडक मोहीम राबवली. यात जालना शहराच्या विविध भागांत पाहणी केली असता तब्बल ६६ ग्राहकांनी स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड, फेरफार करून वीजचोरी केल्याचे आढळले.

वीजचोरी करणाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे : दगडू श्रावण सोनवणे, विशाल अंबादास जावळे, शेख बद्रुद्दिन गुलास हुसेन, विलास चोखोबा वाघमारे, शीलाबाई लिंबाजी खरात, ज्ञानदेव रामजी खरात, काशीनाथ नागनाथ ढेंपे, रत्नमाला शिवाजी राऊत, शेख महंमद जमाल, मीनाबाई सुरेश खडसे, शेख जुबेर शेख अकबर, पद्माबाई शहादेव खाडेकर, सर्जेराव अंकुशराव थोरात, लताबाई दिलीप निकम, भगवान काशीनाथ जायभाये, अनिशा अमोल वायाळ, शोभा श्रीराम मते, तुकाराम लक्ष्मणराव कोल्हे, रामनिवास लक्ष्मीनारायण अग्रवाल, रहीमखान बनेखान पठाण, शेख पाशू शेख इब्राहीम, राजू मंजितराव दुधाने, सामियाबेगम सय्यद, सुनीताबाई वसंतराव गरबडे, शेख अब्दुल शेख उस्मान, शेख निसार शेख इसाक, ज्ञानदेव बाबुराव ढेमरे, प्रभाकर माधवराव पवार, अनंत माधवराव पवार, शेख नासेर शेख आमीर, प्रेमकुमार मारोती लोखंडे, रमेश पंढरीनाथ निकास, रमेशराव लक्ष्मणराव वाघ, सय्यद मलिक सय्यद आरेफ, कौतिकराव भुजंगराव इंगळे, सुरेश तुकाराम झिने, भगवान संभाजी शिंदे, गणपत सयाजी बोर्डे, रसवंती नारायण वाघमारे, प्रकाश कडुबा म्हस्के, गंगाबाई बाबुराव स्वामी, कोंडिबा देवराव गवळे, मोतीराम एकनाथ कदम, सिंधू विष्णू जेठेवाड, देवीदास केशवराव भुतेकर, शालिनी जनार्दन पुंड, नीलम श्यामलाल वर्मा, प्रसन्ना बिमल तिवारी, शेख बशीर शेख मुनीर, संजय दशरथ खंडागळे, लक्ष्मण महादू विटेकर, सौदाराम ए. परदेशी, दत्ता अप्पासाहेब वखरे, मधुकर काशीराव जाधव, संतोष काकासाहेब मुळे, गंगालाल एस. चौधरी, ज्ञानदेव बबन जाधव, अब्दुल लतिफ अब्दुल रेहमान, आलोक नंदलाल जैस्वाल, कमलबाई प्रेमानंद घोरपडे, चंपालाल गिरिजाप्रसाद जैस्वाल, रावसाहेब नामदेव पैठणे, रामकली गिपीलालजी गोयल, शामलाल हरीराम मखिजा, निर्मलाबाई पुंडलिकराव बडग, भगवान जनार्दन मघाडे. या सर्व ग्राहकांनी स्मार्ट टीओडी मीटरमध्ये फेरफार करून ८ लाख ८० हजार ११० रुपयांची ३९ हजार ८७० युनिट वीजचोरी केली.

ही मोहीम अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष देशमुख, राजेंद्र राजपूत, रणधीर खंडागळे, उपकार्यकारी अभियंता प्रवीण पाटील, राहुल जायभाये, सहायक अभियंता सचिन बनकर, सचिन उकंडे, सौरभ मेटांगे, सचिन गुल्हाणे, संजय गहाणे, सचिन बनकर, कनिष्ठ अभियंता स्वप्नील सोनुने, सहायक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी मोहन गायकवाड, योगेश बोरसे, अक्षय जोगी, अभिजित जाधव व कर्मचाऱ्यांनी राबवली.

पोलिसांकडूनही धडक कारवाईची अपेक्षा

टीओडी मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी होत असल्याचे अनेक प्रकार जालना शहरात यापूर्वी उघडकीस आले आहेत. या प्रकरणी गेल्या दोन महिन्यांतच ग्राहक, मीटर बसवणारा उपकंत्राटदार, त्याचा कर्मचारी, एक बाह्यस्रोत कंत्राटी कर्मचारी, अज्ञात इसम अशा एकूण ६५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे शहर व जिल्ह्यात अत्याधुनिक टीओडी मीटरमध्ये ग्राहकांना फेरफार करून देणारे रॅकेट सक्रिय असण्याची शक्यता आहे. या प्रकरणी पोलिसांत गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र पोलिसांनी सर्व आरोपींना अटक करून त्यांची चौकशी करण्याची गरज आहे. तरच मीटरमध्ये फेरफार करणारे किती लोक आहेत व त्यांचा मास्टरमाइंड कोण आहे, हे उघडकीस येऊ शकेल. या प्रकरणात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनीच लक्ष घालून तातडीने पावले उचलण्याची गरज आहे, नसता जालना जिल्ह्यातील वीजचोरीचे प्रकार थांबणार नाहीत आणि वीजचोरीचा प्रामाणिक वीजग्राहकांनाही भुर्दंड बसत राहील.अत्याधुनिक प्रणालीमुळे मीटरमधील फेरफार महावितरणला तत्काळ माहीत होत आहे. वीजचोरी हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून या गुन्ह्यात तीन वर्षे कारावास किंवा दंड अथवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे.

## संक्षिप्त

### शिवसेना आयोजित होम मिनिस्टर कार्यक्रमाला महिलांचा प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** जालना शहरातील कुंभारगल्लीतील इच्छापूर्ती मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी होम मिनिस्टर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रम २०१४ पासून आयोजक शिवसेना शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले हे घेतात.या कार्यक्रमात २०० ते २५० महिलांनी या कार्यक्रमात भाग घेतला होता. या कार्यक्रमात विजेता महिलांना शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जालना शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांच्या वतीने बक्षिसे देण्यात आली.सदरील कार्यक्रम शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बक्षिस वितरण करण्यात आले. होम मिनिस्टर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बापू शिंदे, अभिमन्यू काठोठीवाले,चेतन गुप्ता, मयूर धोत्रे,कुणाल वाघमारे,अभिषेक लव्हाळे, ऋषिकेश लव्हाळे, रोहन तोडकर, सोहम फाटक्कर,हिमेश तोडकर,अक्षय जोराले, चेतन पल्लये, लोकेश अजगे,रोहित अजगे, कपिल व्यास आदींनी परिश्रम घेतले.



# घनसावंगी तहसील कार्यालयावर शिवसेना उबाठाच्या वतीने हंबरडा मोर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी/प्रतिनिधी/** घनसावंगी तालुक्यामध्ये अतिवृष्टी व ढगफुटी सदृष्य पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे.

यामध्ये पिकांचे, जमीनीचे, विहिरीचे, घरांची पडझड तसेच जनावरांचे देखील नुकसानीसह अन्य प्रकारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे जनजीवन पुर्णपणे विस्कळीत झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी,तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या मागणीससह इतर मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर शिवसेना उबाठाच्या वतीने हंबरडा मोर्चा काढण्यात येऊन निदर्शने करण्यात आले.




**शेतकऱ्यांना कर्जमाफीसह तात्काळ आर्थिक मदत देण्याची केली मागणी**

आणि निवेदन तहसीलदार पूजा वंजारी यांना देण्यात आले.

घनसावंगी तालुका शिवसेना उबाठाच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की,अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना हेक्टर ५० हजार रुपयांची आर्थिक मदत त्वरीत जाहिर करावी,नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जातुन कर्जमुक्त करावे,पिक विम्याचे कठीण निकष तातडीने शिथील करुन पंचनाम्याची प्रक्रिया बाजुला ठेवत विम्याची रक्कम त्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरीकांना जुने निकष न लावता योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरीत देण्यात यावा, फळ बागायतदार शेतकऱ्यांची फळ गळ झालेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत त्वरीत खात्यात जमा करावी.

फार्मर आयडीची सक्ती न करता ७/१२ धारक सर्व शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनावर युवासेना जिल्हाध्यक्ष गणेश कनके, उबाठा तालुकाप्रमुख संदीप कंटूले, गटनेते यादव देशमुख, बबनराव घोगरे, ज्ञानेश्वर आर्दड, बळीराम देशमुख, ऋषिकेश म्हस्के, अनिकेत ढवळापुरे, राजू वखरे, भगवान काळे, संतोष जाधव, वैभव खरात, अबन देशमुख, संतोष कथले, महेश पाचागरे, सोहेल शेख, गणेश देशमुख यांच्यासह इतरांच्या स्वाक्षरी आहेत.

# जलतरण प्रशिक्षक कैलाश झोळगे ठरले जालन्याचे पहिले लोहपुरुष

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जगातील सर्वात कठीण स्पर्धा मानल्या जाणाऱ्या हाफ आयर्नमॅन २०२५ या प्रतिष्ठित स्पर्धेत जालन्याचे सुपुत्र व प्रख्यात जलतरण प्रशिक्षक कैलाश झोळगे यांनी अभूतपूर्व कामगिरी करत लोहपुरुष हा बहुमान पटकावला आहे. या यशामुळे ते जालन्याचे पहिले आयर्नमॅन ठरले असून, शहराचा क्रीडाअभिमान अधिकच उंचावला आहे.कोल्हापूर येथे ५ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या या कठीण स्पर्धेत झोळगे यांनी सलग १.९ किमी जलतरण, ९० किमी सायकलिंग, आणि २१.१ किमी धावणे असे एकूण ११३ किमी अंतर केवळ ७ तास ५ मिनिटे ४४ सेकंदात पूर्ण केले. ही कामगिरी त्यांची सहनशक्ती, शिस्त, चिकाटी आणि मानसिक स्थैर्य यांची साक्ष देणारी ठरली आहे. लोहपुरुष हा किताब फक्त एक विजेतेपद नसून, तो खेळाडूच्या अंतःप्रेरणा, सातत्यपूर्ण सराव आणि स्वतःवरच्या अढळ विश्वासाचे प्रतीक आहे. झोळगे यांनी आपल्या अथक मेहनतीने आणि विलक्षण एकाग्रतेने हे यश प्राप्त केले आहे.



कैलाश झोळगे यांनी गोल्डन जुबिली स्कूल, जालना येथे सलग १३ वर्षे स्विमिंग प्रशिक्षक म्हणून कार्य केले आहे. सध्या ते जालना सिव्हिल क्लब येथे स्पोर्ट्स क्लबचे प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत.त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल जालना शहरातील नागरिक, क्रीडाप्रेमी, विद्यार्थी व सहकारी वर्गाकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी - जिल्हाधिकारी मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सन २०२४-२५ या वर्षाच्या खरीप हंगामात खरीप गावांची तसेच ज्या रब्बी गावांत दोन तृतीयांश पेक्षा जास्त खरीपात पेरणी केलेली आढळली आहे, त्या गावांची पैसेवारी देखील खरीप हंगामात जाहीर करण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार जालना जिल्ह्याच्या आठ तालुक्यातील खरीप पिकांच्या पैसेवारीमध्ये खरीप गावे एकूण ६६७ व रब्बी गावे २९८ अशा एकूण ९६५ गावांची खरीप हंगामी पैसेवारी जाहीर केली आहे. यामध्ये जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील ९७१ गावांपैकी ६६७ खरीप गावे व २९८ रब्बी गावे असे एकुण ९६५गावांची हंगामी पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. तर परतूर तालुक्यातील राणी वाहेगाव हे गाव पूर्णत: निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच मंठा तालुक्यातील चांदेश्वर व गोपेगाव हे गाव पुर्णत: निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे तसेच गारटेकी, सोनुनकरवाडी व किर्तापूर तांडा या गावांना महसूल दर्जा प्राप्त नसल्यामुळे मंठा तालुक्यातील ५ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. जालना जिल्ह्यातील पैसेवारी जाहीर केलेल्या एकुण ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे. खरीप पिकांची हंगामी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. जालना तालुका - १५१ गावे, बदनापूर-९२, भोकरदन-१५६, जाफ्राबाद-१०१, परतूर-९८, मंठा-११७, अंबड-१३८, घनसावंगी-११८ गावांचा समावेश आहे.

# पडलेल्या घरांतून पुन्हा उभी राहते स्वप्नं..समाजभानच्या हातातून मदतीचा स्पर्श

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी/प्रतिनिधी/**मराठवाड्यातील अतिवृष्टी आणि गोदावरी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान झालेच, परंतु गोदाकाठच्या गावांतील असंख्य गोरगरीब कुटुंबांची घरेही कोसळून उद्ध्वस्त झाली. गावोगावे पाण्याखाली गेल्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे लागले. या आपत्तीच्या काळात पूरग्रस्तांच्या मदतीसाठी समाजभान आणि प्रकाशयात्री फाऊंडेशन गेल्या दहा दिवसांपासून अपार मेहनत घेत आहेत.

**गरजूंना घरपोच आर्थिक मदत आणि अन्नधान्य वाटप**



पूरपरिस्थितीत विस्थापित कुटुंबांना अन्नछत्राद्वारे भोजन पुरवण्यापासून जीवनावश्यक किराणा साहित्याचे वितरण समाजभानच्या स्वयंसेवकांकडून सातत्याने केले जात आहे. पूर ओसरल्यानंतर गावागावात घरांची पडझड, भिंतींचे ढासळणे आणि पाण्यामुळे झालेले नुकसान पाहून अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले. हातावर पोट असणाऱ्या या कुटुंबांची दिवाळी अंधारात जाऊ नये, या भावनेतून समाजभानने पुढाकार घेतला आहे.संस्थेकडून पूरग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी दहा हजार रुपये रोख मदत आणि किराणा साहित्य घरपोच देण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात समाजभानचे दादासाहेब थेटे यांनी स्वतःचा अर्धा पगार संस्थेकडे सुपूर्द करून केली आहे.

तसेच जालना येथील उद्योजक सुनील रायठ्ठा यांनी एक लाख रुपयांची मदत, तर कोल्हापूरच्या आधार फाऊंडेशनने पन्नास हजार रुपये योगदान देऊन सामाजिक उत्तरदायित्वाची सुंदर उदाहरणे घालून दिली आहेत.पूरामुळे उद्ध्वस्त झालेल्या गोदापट्ट्यातील १३० घरांना, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना, तसेच निराधार वृद्धांना दिवाळीपूर्वी मदत पोहोचवण्याचा निर्धार समाजभानने केला आहे. या कार्यात स्वयंसेवक अत्यंत समर्पणाने झटत असून, समाजासाठी समाजच उभा राहतो, तेव्हाच बदल घडतो या भावनेने हा उपक्रम लोकसहभागातून यशस्वी होत आहे.



# शांताई सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने आपत्तीग्रस्त कुटुंबांना जीवनोपयोगी साहित्य वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**

**वडीगोद्री/ प्रतिनिधी /** अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक भागात मोठ्या प्रमाणावर शेती आणि घरांचे नुकसान झाले आहे.अनेक कुटुंबे अडचणीत सापडली असून,त्यांच्या जगण्यावर संकट ओढवले आहे.या संकटाच्या काळात शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान यांनी सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात पुढे केला आहे.

शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानच्यावतीने निराधार,वंचित आणि आपत्तीग्रस्त कुटुंबांना जीवनोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.यामध्ये किराणा साहित्य गव्हाचे पीठ,तांदू, हळद,मिरची पावडर,साखर,चहा पावडर,शेंगदाणे, डाळी,बिस्कीट,चिवडा यासह आवश्यक साहित्य यांचा समावेश होता.या मदतीमुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.

या उपक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष आर. व्ही. छल्लारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेचे कार्यकर्ते व स्थानिक युवकांनी गावागावात जाऊन प्रत्यक्ष भेट देत मदत पोहोचवली.या प्रसंगी अध्यक्ष आर व्ही. छल्लारे म्हणाले की,सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून संकटाच्या काळात समाजासोबत उभे राहणे हीच खरी सेवा आहे.प्रत्येक सक्षम नागरिकाने आपल्या परीने अशा आपत्तीच्या काळात हातभार लावून मदत केली आहे.

# अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासनात गतिमानता व लोकाभिमुखता आणण्यासाठी अभियानात सक्रीय सहभाग घ्यावा-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धेत उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांना व कर्मचाऱ्यांच्या कामाची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये घेतली जाणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, संस्था आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासनात गतिमानता व लोकाभिमुखता आणण्यासाठी या अभियानात सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धे विषयी जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवार दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा या अभियानाचा कृती कालावधी प्रतिवर्षी दि.२० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर असा असतो. योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी दि.१६ ऑक्टोबर २०२५ पासून ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. या योजनेचे अर्ज स्विकारण्यासाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा पोर्टल विकसीत करण्यात आले असून या संकेतस्थळाची लिंक रिसरींळरलहळूरप.ारहरीरीहींीर.सीें.ळप अशी आहे.स्पर्धेसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची मुदत दि.१६ ते ३१ ऑक्टोबर २०२५ अशी असून वेळापत्रक शासन निर्णयातील परिशिष्ट क मध्ये दर्शविण्यात आले आहे. प्रस्ताव तपासणीसाठी तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्य अशा चार स्तरावर निवड समित्या असतील. तालुकास्तरील प्रस्ताव जिल्हा समितीकडे, जिल्हास्तरावरील प्रस्ताव विभागीय समितीकडे आ णि विभागीय स्तरावरील प्रस्ताव राज्य समितीकडे पाठविले जातील. कार्यालयीन व्यवस्थापन, सेवांची गुणवत्ता, लोकाभिमुखता, ई-गव्हर्नस,संसाधनाचा प्रभावी वापर, तंटा व तक्रार मुक्त कार्यालय आणि नाविण्यपूर्ण संकल्पना, उपक्रम अशा सात प्रमुख कार्यक्षेत्रावर ही स्पर्धा आधारीत असणार आहे. तरी शासकीय संस्था, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय सुधारणाबाबत आपले प्रस्ताव शासन निर्णयात नमुदप्रमाणे कार्यवाही करुन पाठवावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813